संकीर्ण फौजदारी खटला क्र.१३६०/०७
सै.शहाबुददीन...वि...रामदेवबाबा व ईतर

## आदेश नि.क.७८

फिर्यादीने आरोपी विरुध्द एन.आय.ॲक्टचे कलम १३८ अंतर्गत फिर्याद दाखल केली असुन विद्यमान न्यायालयाने आरोपी विरुध्द प्रोसेस इशु केला. त्यावरुन आरोपी हे न्यायालयात हजर झाले व त्यांनी प्रकरणात जमानत घेतली आहे. सदरील प्रकरण पुर्वी फिर्यादी म्हणुन काजी सै.मजहरोददीन हे चालवित होते परंतु त्यांचे निधन दिनांक १९.०८.२००८ रोजी झाल्यामुळे त्यांचे नंतर विद्यमान न्यायालयाच्या परवानगीने फिर्यादी सदरहु फिर्याद पुढे चालवित असुन सदरील प्रकरण सध्या पुराव्या करीता नेमण्यांत आले आहे.

०२ सदरहु प्रकरणामध्ये प्रतिज्ञालेखाद्वारे पुरावा दाखल करण्याकरीता प्रतिज्ञालेख तयार करीत असतांना फिर्यादीला असे आढळुन आले की, फिर्यादीच्या वडीलांकडुन महत्वपुर्ण बाबी नमुद करण्याची फिर्यादीत राहुन गेले आहे. म्हणुन खालील प्रस्तावित दुरुस्ती करणे आवश्यक आहे. जेणे करुन विद्यमान न्यायालया समोर संपुर्ण वस्तुस्थिती व घटनाक्रम येवु शकेल व न्यायालयास न्यायदानामध्ये अडचण जाणार नाही. तसेच फिर्यादीच्या बाजुने त्याच्या प्रकरणात कोणतीही तांत्रिक उणीव राहणार नाही. जेणे करुन त्याचा गैरफायदा आरोपी उचलु शकतात. म्हणुन फिर्यादीला खालील प्रस्तावित दुरुस्ती करण्याची परवानगी असावी.

### प्रस्तावित दुरुस्ती.

०३ परिच्छेद क्रमांक १ अ म्हणुन :— आरोपी क्रमांक १ ते ४ हे मे.रामदेवबाबा डेव्हलपर्स या भागीदारी फर्मचे भागीदार असुन या फर्मद्वारे ते कृषक जमीन विकत घेउन व त्याला अकृषक वापरात परावर्तीत करुन व जमीनीला विकसीत करुन त्यामध्ये निवासी तसेच वाणिज्य उपयोगाकरीता भुखंड पाडुन त्यांची विक्री करतात व या व्यवसायाच्या दैनंदीन व्यवहाराकरीता आरोपी क्रमांक १ ते ४ हे सारख्या प्रमाणात जबाबदार व उत्तरदायी असतात. सबब आरोपी क्रमांक १ ते ४ यांच्याकरीता आरोपी क्रमांक २ व ४ यांनी त्यांच्या सहीनिशी खालील परिच्छेदात नमुद केलेला धनादेश फिर्यादीस दिला.

०४ उपरोक्त दुरुस्ती करणे फिर्यादीला अत्यंत आवश्यक व न्यायसंगत आहे. अन्यथा फिर्यादीचे अपरीमीत असे नुकसान होउ श्कते. सदरहु प्रकरणात सध्या पुरावा सुरु व्हायचाच असुन सदरील दुरुस्ती करण्याची परवानगी दिली गेल्यास आरोपीचे कोणतेही नुकसान होणार नाही. उपरोक्त प्रस्तावित दुरुस्ती ही न्यायालयाच्या माहिती करीता करणे आवश्यक असुन सदरील दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात आली नाही तर फिर्यादीचे नुकसान होउ शकते. म्हणुन फिर्यादी मध्ये सदर अर्ज दाखल केला.

०५ सदर अर्जास आरोपींनी खालील मुद्यांवर विरोध केला. अर्जास विरोध आहे. फिर्यादीने सदर अर्ज कोणत्या तरतुदीखाली केलेला आहे हयाबददल नमुद केलेला नाही. क्रि. प्रो.कोड व एन.आय.ॲक्ट मध्ये अशा प्रकारची कोणतीही तरतुद नाही. म्हणुन सदर अर्ज टेनेबल नाही. फिर्यादीने प्रस्तावित केलेली दुरुस्ती ही मालाफाईड व बेकायदेशिर आहे हे रेकॉर्ड वरुन स्पष्ट आहे. फिर्यादीने अर्जात केलेली विधाने पश्चात बुध्दीची आहे. सबब ती नाकबुल. फिर्यादीचा अर्ज आरोपीचे खर्चासह खारीज करण्यांत यावा. फिर्यादीकडुन आरोपीला १०,०००/— रुपये कॉम्पेनसेटरी कॉस्ट देववावी.

०६ मी फिर्यादीचा अर्ज आणि आरोपींचे म्हणणे काळजीपुर्वक ऐकले. प्रकरणातील तथ्य यांचा काळजीपुर्वक अभ्यास केला. प्रस्तुत प्रकरणात फिर्यादीने आरोपींचे विरुध्द कलम १३८ पराक्रम्य दस्ताऐवज अधिनियम १९८९ प्रमाणे दाखल केलेली आहे. फिर्यादीचे अवलोकन केले असता सदरची फिर्याद २००७ साली सै.मझीरोददीन सै.शहाबुददीन यांचेतर्फे त्यांचे मुखत्यार आम म्हणुन काझी सै.शहाबुददीन यांनी दाखल केलेली आहे. सदरची फिर्याद २००७ साली दाखल झाल्यानंतर मुळ फिर्यादी सै.मझीरोददीन हे मयत झाल्याने त्यांचे वारस प्रस्तुत प्रकरणात अभिलेखावर आणलेले आहेत. परंतु फिर्यादीचे विधीज्ञांचे कथनाचे अनुषंगाने प्रस्तुतच्या फिर्यादीत जरी आरोपी क्र.१ ते ४ यांचा उल्लेख केलेला असला तरीही फिर्यादीत मात्र आरोपी क्र.१ ते ४ हे भागीदार या नात्याने कृषक जमीनी विकत घेउन त्या जमीनीत अकृषीक वापरात परावर्तीत करुन त्या जमीनी विक्री करतात. तसेच आरोपी क्र.१ ते ४ हे धनादेशाच्या अनादरासाठी सारख्याच प्रमाणात जबाबदार आणि उत्तरदायी आहेत. हे कथन

फिर्याद दाखल करतांना अनावधानाने टंकलीखीत करावयाचे राहुन गेले. म्हणुन प्रस्तावित दुरुस्तीच्या आधारे सदरचे कथन फिर्यादीत मांडु द्यावे अशी त्यांनी न्यायालयास विनंती केली. आपल्या कथनाच्या पृष्ठयर्थ त्यांनी खालील न्यायनिर्णयांचा हवाला दिला.

***१. भिमसिंग...वि....कानसिंग २००५ ऑल एम.आर.कि. राजस्थान उच्च न्यायालय पान क.७०.***

***२. धुळे सहकार किराणा वा भुसार व्यापारी नागरी सहकारी पतसंस्था म...वि..मंजु नरेंद्र मंत्री २०११ ऑल एम.आर.कि. मुंबई उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद पान क.२७८३.***

मी उपरोक्त दोन्ही न्यायनिर्णयातील तथ्य काळजीपुर्वक वाचले. उपरोक्त दोन्ही प्रकरणात न्यायालयाला नैसर्गिक न्यायाच्या तत्वाचा विचार करुन फिर्यादीतील चुक दुरुस्त करण्याचा किंवा कलम १३८ पराक्रम्य दस्ताऐवज अधिनियम १९८९ प्रमाणे खालची फिर्याद ही क्वासी सिव्हील नेचर स्वरुपाची आहे. त्यामुळे त्यामध्ये दुरुस्ती करता येते.

०७ मी प्रस्तुत प्रकरणाचे काळजीपुर्वक अवलोकन केले असता आरोपी वरील दोषारोप सिध्द करणे कामी प्रस्तुतची दुरुस्ती फिर्यादीत करणे न्यायोचित आहे. फिर्यादीचा साक्षीपुरावा या प्रकरणात अजुन झालेला नाही. म्हणुन जर अशा प्रकारची दुरुस्ती करण्याची परवानगी फिर्यादीस दिली तर त्याचा आरोपी विरुध्द काहीएक परिणाम होणार नाही. कारण आरोपींनी फिर्यादीचा उलट तपास घेण्याची पुरेपुर संधी मिळणार आहे. याउलट प्रस्तुतची दुरुस्ती नाकारली तर फिर्यादीत वरील स्वरुपाचे आरोप नमुद केलेले नाहीत. म्हणुन संशयाचा फायदा द्यावा अशा स्वरुपाचा युक्तिवाद आरोपीचे विधीज्ञांकडुन होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत प्रस्तावित दुरुस्ती ही सदर प्रकरणाचा गुणोत्तरावर न्यायनिर्णय होणे करीता अत्यंत आवश्यक आहे असे माझे स्पष्ट मत आहे. म्हणुन मला आरोपीचे विधीज्ञांचे युक्तिवादात तथ्य वाटत नाही. फिर्यादीचा अर्ज हा दुष्ट हेतुने दिला आहे. त्याचप्रमाणे फौजदारी प्रकिया संहितेत फिर्याद दुरुस्त करण्याची कोणतीही तरतुद नाही. मी यापुर्वीच ग्राहय धरल्याप्रमाणे कलम १३८ पराक्रम्य दस्ताऐवज अधिनियम १९८९ प्रमाणे

खालची फिर्याद ही क्वासी सिव्हील नेचरची आहे. त्यामुळे याला दिवाणी प्रक्रिया संहितेच्या ज्या काही तरतुदी आवश्यक असतील त्या तरतुदी लागु राहतील. याचे दुसरे कारण म्हणजे फौजदारी प्रक्रिया संहितेत फिर्यादीचे वारस अभिलेखावर आणता येतात अशी कोणतीही तरतुद नाही. परंतु कलम १३८ पराक्रम्य दस्ताऐवज अधिनियम १९८९ प्रमाणे खालची फिर्याद ही क्वासी सिव्हील नेचरची आहे. त्यामुळे याला दिवाणी प्रक्रिया संहितेच्या ज्या काही तरतुदी आवश्यक असतील त्या तरतुदी लागु राहतील. अशा परिस्थितीत फिर्यादीचा फिर्याद दुरुस्तीचा अर्ज मंजुर केल्यास खटल्यावर काही उलट परिणाम होणार नाही. म्हणुन फिर्यादीचा अर्ज मंजुर होणेस पात्र आहे असे मी ग्राहय धरीत आहे. करीता आदेश.

## आ दे श

१. नि.क्र.७८ फिर्यादीचा अर्ज मंजुर करण्यांत येतो.

२. फिर्यादीने प्रस्तावित दुरुस्ती आजपासुन १४ दिवसाचे आंत करावी. अन्यथा फिर्यादीस दुरुस्ती करावयाची नाही असे समजुन प्रकरण पुढे चालविले जाईल. तसेच फिर्यादीने दुरुस्ती केल्यानंतर न चुकता नमुद केलेल्या पुढच्या तारखेस दुरुस्ती फिर्याद दाखल करावी.

३. खर्चाबददल आदेश मुळ फिर्यादीचे निकालासोबत करण्यांत येईल.

दिनांक २०.०४.२०१३

(ल.गो.पाच्छे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
दारव्हा.